महाराष्ट्र शासन
GRANT GOVT. MEDICAL COLLEGE &
+ SIR J.J.GROUP OF HOSPITALS, MUMBAI +
(GOVERNMENT OF MAHARASHTRA)
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर ज.जी. समुह रुग्णालय, मुंबई ४००००८
Tel.No.३७३ ५५ ५५, ३७३ ११४४ ; Fax No.३७३ ५५ ९९; e-mail § gmcgss3@gmail.com

जा.क्र.ग्रँशावैम/राजप/सहाय्यक प्राध्यापक/जाहिरात/३११०/२०२६, दिनांक :- ०७/०८/२०२६.
वेबसाईटद्वारे प्रसिध्द (gmcjjh.edu.in/)

# "जाहिरात"

विषय :- सहाय्यक प्राध्यापक पदे ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संस्थास्तरावर निवड समितीमार्फत भरणेबाबत.....

संदर्भ :- १) शासन पत्र क्र.MEDD-१२/१४३/२०२५-MMD(Vais-२)/१४७०४९१, दि.१३ डिसेंबर,२०२५.

२) मा.आयुक्त वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांचे पत्र क्र. DMER-१३/७१/२०२५-EST/७२५५, दि.२२/१२/२०२५ चे पत्र.

३) शासन निर्णय क्र.डिएसवी १२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा ३,दि १०.०८.२००१.

४) शासन निर्णय क्र.वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२ दि ३१.१२.२०२०.

५) एनएमसी अधिसूचना, दिनांक ३० जून,२०२५/आषाढ ९,१९४७.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन शासन निर्णय दि. १० ऑगस्ट २००१ अन्वये, अधिष्ठाता यांना प्रदान केलेल्या प्राधिकारात विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करुन सहाय्यक प्राध्यापक "गट-ब" या पदावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरती नियुक्तीचे अधिकार संस्थास्तरावर संबंधित अधिष्ठातांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुषंगाने ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीयय महाविद्यालय,मुंबई,सेंट जॉर्जेस रुग्णालय,मुंबई व ,नागरी स्वास्थ केंद्र,वांद्रे,मुंबई या संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक, यांची रिक्त पदे ३६४ दिवसांच्य कालावधीकरीता किंवा मा.शासन/संचालनालय, मुंबई यांचे मार्फत बंधपत्रित उमेदवार अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत/शासन निवड मंडळ अथवा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थास्तरावरील निवड समितीमार्फत कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मानधन व गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि. १२/०८/२०२६ ते दि.२१/०८/२०२६ सकाळी ११.०० ते सायं ०५.०० वाजेपर्यत (सुट्टीचे दिवस वगळून) |
| २) | मुलाखतीचा दिनांक | दि.०४/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता. |
| ३) | मुलाखतीचे ठिकाण | सहयोगी अधिष्ठाता, यांचे दालन नवीन प्रशासकीय भवन, ३ रा मजला, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई. |

इच्छुक उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (gmcjjh.edu.in/) प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीसोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध (Download) करुन घ्यावा. तसेच संदरील अर्ज परिपुर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्र/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात (जाहिरातीमधील अटी व शर्ती क्र.१८ व विहीत नमुन्यातील अर्जात नमूद केल्याप्रमाणे) उमेदवारांनी कार्यालयातील आवक-जावक शाखेस प्रत्यक्ष सादर करावे. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये ऑनलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांसह व साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहील्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील ३६४ दिवसांकरीता भरावयाच्या पदांची माहिति खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Name of subject | Vacant Post | Required Educational Qalification. As per NMC Guidelines Date 30.06.2025 | Experience |
|---|---|---|---|---|
| 1. | Anatomy | 03 | MS (Anatomy)/M.D. Anatomy/MBBS with M.SC (Anatomy)/M.SC(medical Anatomy)/ with Ph.d(medical Anatomy)/M.SC.Medical Anatomy with D.SC.Medical Anatomy/DNB. | One year as Senior Resident in the concerned subject in a recognized / permitted medical college after acquiring MD/MS/BDS Degree |
| 2. | Physiolgy | 06 | M.D. (Physiology)/MBBS withM.Sc.(Medical Physiology)/M.Sc. (Medical Physiology) with Ph.D. Medical Physiology/ M.Sc. Medical Physiology with D.Sc. Medical Biochemistry/DNB. | |
| 3. | Biophysics | 01 | M.D/M.Sc. in the Biophysics Subject | |
| 4. | Biochemistry | 03 | MD in the Biochemistry Subject | |
| 5. | Forensic Medicine | 01 | MD/MS/DNB in the Forensic Medicine Subject | |
| 6. | Microbiology | 01 | MD in the Microbiology Subject | |
| 7. | Pathology | 01 | MD/MS/DNB in the Pathology Subject | |
| 8. | Pharmacology | 02 | MD in the Pharmacology Subject. | |
| 9. | Community Medicine | 01 | M.D Social and Preventive Medicine/M.D.Community Medicine/DNB. | |
| 10. | General Medicine | 04 | MD/MS/DNB in General Medicine Subject. | |
| 11. | General Surgery | 01 | MD/MS in the General Surgery Subject. | |
| 12. | Anaesthesia | 07 | MD in the Anesthesia Subject. | |
| 13. | Anaesthesia (St.George Hospital,Mumbai) | 01 | MD in the Anesthesia Subject. | |
| 14. | General Medicine (St.George Hospital,Mumbai) | 01 | MD in the General Medicine Subject. | |
| 15. | Radiology | 01 | MD in the Radiology Subject. | |
| 16. | Ophthalmology | 01 | MD in the ophthalmology Subject. | |
| 17. | Dental Surgeon (J.J. Group of Hospital,Mumbai) | 01 | BDS in the Dental Surgeon Subject. | |

उक्त नमूद दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तक्त्यात नमुद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदांसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तद्नंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवारांची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सूचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती :-

१.अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२.सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी :- सदरील उमेदवारांना दि.३१/१२/२०२० च्या शासन निर्णय तरतुदीनुसार रु.१,००,०००/-(अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील सदर वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्ठांमधून भागविण्यात येईल.

३.वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय अराखीव वर्गाकरीता ४० वर्षाविक्षा अधिक असणार नाही. तसेच मागास उमेदवारांसारठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

४.गुणवत्ता यादी ही उपरोक्त नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५.जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहेत.

६.उमेदवार या महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे "ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे ? असल्यास केव्हा ? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

७.ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८.सदर पदांकरिता उमेदवाराची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी) राहील. ३६४ दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा ३६४ दिवसांसाठी पुनर्नियुक्ती बाबत प्रस्ताव मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष मुंबई यांना सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

९.अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांप्रती साक्षाकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१०.सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणांस या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय राहणार नाहीत.

११.निवड झालेल्या उमेदवारास ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कोणत्याही सलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल जसे सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई किंवा नागरी स्वास्थ केंद्र, वांद्रे यापैकी कोणत्याही संस्थेत काम करावे लागेल व प्रशासनास आवश्यकता असल्यास यापैकी कोणत्याही रुग्णालयात नेमणुकीत बदल करण्यात येईल.

१२.करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१३.करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

१४.उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थि सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पध्दतीने नि देण्यात येईल शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता उमेदवाराचा राजी कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१५.अर्जदाराने संबंधित पदासाठी शारिरीक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी आवश्यक असून, रुजू झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत चारित्र्य पडताळणीचा फॉर्म (२ प्रतीत) सादर करावे.

१६.अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमा किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१७.उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१८.मुलाखतीस येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मूळ कागदपत्रे सोबत येताना आ बंधनकारक राहील.

१९.खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे :-

a) Mark Sheet ( I MBBS, II MBBS, III/I MBBS,III/II MBBS), Passing & Attempt Certificate Of MBBS.
b) Internship Completion Certificate.
c) Mark Sheet, Passing & Attempt Certificate Of M.D/M.S.
d) MBBS & MD/MS, MMC/MCI Registration Certificate.
e) Experience Certificate Of (Junior Resident, Senior Resident, Asst. Professor).
f) Caste & Caste Validity Certificate For Reserved Category.
g) Non-Creamy layer Certificates & Domicile Certificate.
h) SSC Certificate/ DOB Certificate
i) Aadhar Card, PAN Card
j) EWS Certificate.
k) 1 Year Senior Resident Service Experience Mandatory.

२०.तसेच सहाय्यक प्राध्यापकांना मुलाखतीकरीता प्रवेश अर्ज शुल्क रुपये.५००/- ( अक्षरी रुपये पाचशे फ…) शासन तिजोरीत भरण करुन त्यांची पावती फॉर्म सोबत जोडण्यात यावे.

उक्त रिक्त असलेल्या पदाकरीता सहाय्यक प्राध्यापक या पदावर नियुक्ती संबंधात यापुर्वी ज… अर्ज/निवेदने सादर केली आहेत त्यांनी नव्याने विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यापुर्वी स… केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

वरील जाहिरातीनुसारी अर्हताप्राप्त उमेदवार प्राप्त न झाल्यास सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने … दोन महिन्यापर्यंत दर बुधवारी Walk-In Interview अर्जाप्रमाणे नियोजित केले जाणार आहेत.

अधिष्ठाता,
ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मुंबई.

प्रति,

१. उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.

प्रत :-

१. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष, मुंबई यांना माहितीस्तव सादर.